# भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे

**स्वप्न अर्थपूर्ण करणारी बँक**

'निवेदिता भवन', सीटीएस नं.३४/७,फायनल प्लॉट नं.३५/७ बी,
प्रभात रोड, लेन नं.८, एरंडवणा, पुणे ४११००४
Website : www.bhagininivedita.bank.in ■ Email : ho@bhagininivedita.bank.in
**फोन नं. : ०२०-२५४४७६२०, ०२०-२५४४७६२१**

संस्थापक
**कै. सीए विवेक गणेश दाढे**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित, पुणे या बँकेच्या सर्व सभासद बंधू-भगिनींना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, बँकेची चोपन्नावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि.२१/०८/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता, टिळक स्मारक मंदिर, टिळक रोड, पुणे ४११ ०३० येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेत खालील विषयांचा विचार केला जाईल. तरी सभेस आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. २०/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) बँकेच्या आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या कार्याबद्दलच्या अहवालाची माहिती घेणे व स्वीकृत करणे. तसेच बँकेचे दूरगामी धोरण व वार्षिक ध्येयधोरण यास मान्यता देणे.
३) दि. ३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचा विचार करणे व स्वीकृत करणे.
४) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालावर व आर्थिक वर्ष २०२४-२०२५ च्या वैधानिक लेखा परीक्षण दोषदुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
५) मा.संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींनुसार आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मान्यता देणे तसेच लाभांश जाहीर करणे.
६) मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या आर्थिक वर्ष २०२६-२०२७ च्या उत्पन्न-खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व मागील ३ वर्षांच्या प्रगतीची माहिती घेणे.
७) बँकेचे मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्या दि.३१/०३/२०२६ अखेरील कर्जाची, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५(२) नुसार माहिती देणे.
८) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन, मा. संचालक मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी करावयाच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या पुनर्नेमणूकीस व त्यांना द्यावयाच्या मेहनतान्यास मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मंजुरीस अधीन राहून)
९) आर्थिक वर्ष २०२७-२०२८ साठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याचे व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबतचे अधिकार मा. संचालक मंडळास देण्याबाबत निर्णय घेणे.
१०) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या स्टाफिंग पॅटर्नला मान्यता देणे.
११) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण यांकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची आणि पुढील वर्षाच्या योजनांची नोंद घेणे.
१२) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार बुडीत व संशयित कर्जखात्यांची नावे बाकी वसुलीचा हक्क अबाधित ठेवून निर्लेखित करण्यास मान्यता देणे.
१३) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची रजा क्षमापित करणे.
१४) मा.अध्यक्षांच्या अनुज्ञेने ऐन वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आज्ञेवरून
**सही/-**
**महानंदा अल्याळमठ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

दिनांक : ३०/०६/२०२६
ठिकाण : पुणे

### टीप :

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी दुपारी २.३० वाजता घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेस गणपूर्तीचा नियम लागू होणार नाही.
२) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल, बँकेचे संकेतस्थळ (Website) www.bhagininivedita.bank.in वर उपलब्ध आहे. तसेच वार्षिक अहवालाची प्रत मुख्य कार्यालय व बँकेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध होईल.
३) वरील वार्षिक सर्वसाधारण सभेत होणाऱ्या विषयांसंबंधी काही सूचना करावयाच्या असल्यास किंवा प्रश्न विचारावयाचे असल्यास त्या सूचना किंवा प्रश्न बँकेच्या मुख्य कार्यालयात/शाखेत दि.१३/०८/२०२६ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत लेखी पाठवावेत.

### सभासदांसाठी सूचना :

१) सभेस येताना कृपया सदर नोटीस बरोबर आणावी.
२) सभासदांनी आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता लेखी कळवावा.
३) ज्या सभासदांनी मागील लाभांशाची रक्कम नेली नसेल, त्यांनी ती त्वरित नेण्याची व्यवस्था करावी. अन्यथा तीन वर्षांनी ती रक्कम बँकेच्या रिझर्व्ह फंडात जमा केली जाते.
४) सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, ज्या सभासदांकडे रु.५००/-पेक्षा कमी रकमेचे शेअर्स आहेत त्यांनी किमान रु.५००/-चे शेअर्स घ्यावेत.
५) कृपया आपल्या खात्याची KYC, Re-KYC अदयावत केल्याची खात्री करावी.
६) पोटनियम क्र.१८/४ नुसार संयुक्त भागधारकांचे बाबतीत प्रथम नाव असलेल्या भागधारकासच सभेस उपस्थित राहता येईल.
७) बँकेत नामांकनाची सुविधा उपलब्ध आहे तरी आपल्या खात्यास नामांकन केल्याची खात्री करावी व केले नसल्यास, शाखेत जाऊन नामांकन करण्यात यावे.

**फक्त सभासदांनाच सभेस प्रवेश दिला जाईल.**